दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र | शनिवार दि.३० नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -९६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## शिवसेनेचा गृह खात्यावर दावा:महायुतीच्या विजयात आमचा मोठा वाटा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महायुतीच्या विजयात शिवसेनेचा मोठा वाटा आहे. पण त्यानंतरही भाजप आम्हाला गृह खाते देण्यास विरोध का करत आहे हे समजत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी राज्याच्या गृहमंत्रीपदावर दावा सांगितला आहे.एकनाथ शिंदे यांनी बुधवारी एका पत्रकार परिषदेद्वारे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याचे स्पष्ट केले. यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाल्याचे चित्र आहे. पण शिवसेनेने गृहमंत्रीपदासारख्या महत्त्वाच्या खात्याची मागणी केल्यामुळे महायुतीच्या सत्तेचे घोडे अडले आहे. शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना शिवसेनेला राज्याचे गृहमंत्रीपद हवे असल्याचे ठणकावून सांगितले. तसेच एकनाथ शिंदे आज सायंकाळपर्यंत उपमुख्यमंत्रीपदावरील आपली भूमिका स्पष्ट करतील असा अंदाजही व्यक्त केला.संजय शिरसाट म्हणाले, एकनाथ शिंदे महाराष्ट्र सोडून केंद्रात जाणार नाहीत हे निश्चित आहे. त्यांची राज्यात कॉमन मॅन म्हणून ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे दिल्लीला जाणे शक्य नाही.

# शिंदेंची जाणीव ठेवत सत्तेत ठेवले हीच मोठी गोष्ट भाजप शिंदेंना गृह खाते कसे देणार?-बच्चू कडू

**मुंबई (वृत्तसंस्था)**–भाजप पूर्ण सत्तेत येऊनही त्यांनी एकनाथ शिंदेंना सत्तेत ठेवले हेच खूप झाले. भाजप एकनाथ शिंदेंना गृह खाते कसे देणार? असा खोचक सवाल प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी उपस्थितकेला आहे. तर एकनाथ शिंदे हे राज्यातच मंत्रिपद स्वीकारतील असेही त्यांनी म्हटले आहे.बच्चू कडू म्हणाले की, भाजप सत्तेत आला ते एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे. भाजप सत्तेत आलीच नसती तर आज जे चित्र दिसत आहे, तसे चित्र दिसले नसते. शिंदेंनी बंड केले नसते तर लाडकी बहिणी योजना देखील आली नसती. त्यामुळे ज्या लाडक्या भावाने लाडकी बहीण योजना शोधून काढली. त्या लाडक्या भावाकडे तुम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही.

दरम्यान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचा तिढा सोडवण्यासाठी गुरुवारी रात्री मध्यरात्रीपर्यंत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी महायुतीच्या नेत्यांची बैठक झाली. जवळपास अडीच तास चाललेल्या या बैठकीत मंत्रिमंडळाच्या खातेवाटपावरही चर्चा झाली. या बैठकीनंतर एकनाथ शिंदे म्हणाले - बैठक सकारात्मक झाली. आमची अमित शहा व जेपी नड्डा यांच्याशी चर्चा झाली. ही पहिलीच भेट होती. महायुतीची दुसरी बैठक मुंबईत होईल. त्यात मुख्यमंत्र्याच्या मुद्यावर निर्णय घेतला जाईल. यातचअडीच वर्षे मुख्यमंत्रिपदावर राहिल्यानंतर उपमुख्यमंत्री होण्यास एकनाथ शिंदे तयार नाहीत. हे पद ते आपल्या पक्षातील इतर नेत्याला देऊ शकतात. मात्र मुख्यमंत्री पद मिळत नसेल तर किमान गृह मंत्रालय तरी आमच्या पक्षाकडे द्यावे, यासाठी शिंदे आग्रही आहेत. तर नगरविकास खाते शिंदे यांच्या आवडीचे आहे. त्यावरही त्यांचा दावा आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नसल्याचे बुधवारी जाहीर केले. मात्र, त्यानंतर शहरातील मुख्य चौकात आमचा लाडका छावा पुन्हा मुख्यमंत्रिपदी हवा, शिंदे सरकार मराठा सरदार अशा आशयाचे होर्डिंग झळकले. होर्डिंगखाली सकल मराठा समाज असे लिहिले आहे. याबाबत एजन्सीकडे विचारणा केली असता, मुंबईच्या एजन्सीने कंत्राट दिल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्रात महायुतीच्या विजयाचे शिल्पकार म्हणून माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले पाहिजे. पण, शहरातील सकल मराठा समाजाच्या नावाचे होर्डिंग आम्ही लावलेले नाहीत. - चंद्रकांत भराट, समन्वयक, सकल मराठा समाज.



## जवळगाव, पुस शिवारात बिबट्याचा वावर
# शेतकऱ्यात भितीचे वातावरण वनपाल अधिकाऱ्यांची या भागात भेटी

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई परिसरातील मुकुंदराज परिसरात गेल्या दहा वर्षापुर्वी बिबट्याचा वावर होता अशी शेतकऱ्यांची समज होती. परंतु वनविभागाने त्याला पिजर्यात जेरबंद करण्यात त्यांना यश आले होते. दहा वर्षानंतर तालुक्यामध्ये बिबट्या दिसल्याची चर्चा नव्हती परंतु बुधवार रात्री जवळगाव, पुस शिवारात बिबट्या ऊसाच्या फडातून बाहेर निघाल्याची दृष्य अनेक शेतकऱ्यांनी पाहिले या गावात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे तर तेलघणा परिसरात बिबट्याच्या पावलाची ठसे हरभऱ्याच्या पिकात उमटल्याचे चित्रफित व्हिडीओ व्हायरल झाल्याने तालुक्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळेचिता अंबाजोगाई तालुक्यात बालाघाटच्या डोंगरदऱ्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे



वन्य प्राणांचा वावर असतो. हे दहा वर्षापुर्वी बुट्टेनाथ परिसरात जनावरांचा फडशा पाडणारा बिबट्या वनविभागाने जेरबंद केला होता. परंतु नंतर येल्डा परिसरात वनविभागाने जाळे लावून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या तावडीतून देखील तो सुटला आणि तेलघणा परिसरात वनविभागाने त्याला जेरबंद करण्यात यश मिळविले. या घटनेला दहा वर्षांचा काळ लोटल्यानंतर पुन्हा एकदा अंबाजोगाई तालुक्यात बिबट्या सक्रिय झाल्याचे शेतकर्याच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी वनविभागाला दुरध्वनीवरून संपर्क साधून बिबट्याच्या वावराची कल्पना दिली. त्यानूसार अंबाजोगाईचे वनपाल अधिकारी विजया शेंगोटे यांनी त्यांच्या पथकासह पुस व जवळगाव परिसरात जावून त्या भागाची पाहणी केली. तसेच तेथील शेतकऱ्यांना भितीचे कारण नाही असे सांगुन बिबट्या दिसताच वन विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी दोन्ही गावातील शेतकऱ्यांशी केला.पुस व जवळगाव शिवारात बिबट्याच्या पावलाचे- ठसे उमटल्याचे निदर्शनास आले आहे या भागात बिबट्या असल्याची दाट शक्यता आहे शेतकऱ्यांनी स्वरक्षणासाठी शेतात जाताना कुऱ्हाड, विळा, गोफन, कोयता काट्या या वस्तुंचा वापर करावा तसेच बिबट्या दिसताच वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन वनपाल अधिकारी विजया शिंगोटे यांनी केले आहे.

# अंबाजोगाई येथे राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेला प्रारंभ



**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या पुरुष मुले एकेरी बॅडमिंटन स्पर्धेला गुरुवारी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला. या स्पर्धेचे उद्घाटन एकेरी आणि पंधरा वर्षा खालील मानवलोक सामाजिक संस्थेचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी दीप प्रज्वलन करून केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे अध्यक्ष राजेश्वर या वेळी तहसीलदार विलास तरंगे, डॉ राजेश इंगोले, अनिल चोरमले, अनिकेत लोहिया, राजेश्वर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले त्यानंतर बॅडमिंटन मैदानावर मान्यवरांनी श्रीफळ वाढऊन आणि बॅडमिंटन खेळून स्पर्धेला सुरुवात केली प्रा. प्रविण दिग्रसकर यांनी स्पर्धे चे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन यशवंत आरसुडे यांने केले.

# बीड जिल्हाधिकारी पदाचा डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्वीकारला पदभार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ (भा. प्र. से ) यांनी आज स्वीकारला. जिल्हाधिकारी अविनाश पाठक (भा. प्र. से ) प्रशिक्षणासाठी जात आहेत. त्यामुळे बीड जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार त्यांनी जालना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे सोपविला. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ २७ डिसेंबरपर्यंत अभ्यागतांसाठी मंगळवारी आणि गुरुवारी उपलब्ध राहणार आहेत.





**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतजी मुंडे यांनी मा. देवेंद्र फडवणीस, साहेब यांची भेट घेऊन विधानसभा निवडणुकीत यशाबद्दल सत्कार करुन अभिनंदन केले.आणि दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका देऊन सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्रात पहिल्यांदा पत्रकारांच्या मागण्या बाबत संवाद यात्रा यशस्वी केल्याबद्दल फडणवीस साहेब यांनी कौतुक करून सरकार स्थापन झाल्यानंतर विक्रेता व पत्रकार महामंडळ कार्यान्वित करण्याबरोबरच इतर मागण्यांचा सकारात्मक विचार करू अशी ग्वाही वसंत मुंडे यांना दिली.**

# परतूरमध्ये प्रा.छबुराव भांडवलकरांच्या 'झुंबर' व्यक्तीचित्रण ग्रंथाचा रविवारी प्रकाशन सोहळा

**जालना । असलम कुरेशी**

ग्रामीण साहित्यिक प्रा. छबुराव भांडवलकर लिखित 'झुबर' या व्यक्तीचित्रण ग्रंथाचा प्रकाशन सोहळा येत्या रविवारी आयोजित करण्यात आला आहे.

अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राम रवणेकर यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा परतूर येथील लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. कैलास अभुरे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. बसवराज कोरे, रावसाहेब ढवळे, यशवंत सोनुने, कावेरी खुरणे, निवृत्त प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, महावितरणचे अभियंता निलेश बेंडाळे आदींची उपस्थिती राहणार आहे.

रविवार दि. १ डिसेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता लालबहादूर शास्त्री महाविद्यालयातील स्व. बाबासाहेब भाऊ आकात सभागृहात आयोजित या प्रकाशन सोहळ्याला साहित्य प्रेमीनी उपस्थित राहावे असे आवाहन आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने करण्यात आले.



# आमदार अमित गोरखे यांना मंत्रीमंडळात स्थान देण्यात यावे-युवा मंचची मागणी

**सिल्लोड । प्रतिनीधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे युवा मंच मातोश्री गयाबाई साबळे सामाजिक प्रतिष्ठान तर्फे शहरातील अण्णाभाऊ साठे ग्रंथालय येथे संचालक मंडळ, पदाधिकाऱ्यांची बैठक आज पार पडली या बैठकीमध्ये सर्वानुमते ठराव करण्यात आला.

देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा. यांना निवेदन पाठवण्यात आलेले असून राज्याच्या मुख्यमंत्रीपदी लोकनेते देवेंद्र फडणवीस, यांनी पद देण्यात यावे तसेच मातंग समाजाचे युवा आमदार अमित गोरखे यांना मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट मंत्रीपदी नियुक्ती करण्यासाठी साठी युवा मंच ची बैठक आज घेण्यात आली .युवा मंचचे प्रवक्ते प्रा. अनिल साबळे यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीमध्ये पंडित आव्हाड, डॉ सचिन साबळे, संतोष थोरात, प्रकाश मिसाळ, रमेश सोळसे, सचिन कांबळे, ओंकार आव्हाड, प्रशांत साबळे,सचिन आव्हाड,विशाल मिसाळउपस्थिति आव्हाड, संजय जाधव, विजय आव्हाड, अनिल सोलसे, गजानन आव्हाड, प्रकाश मिसाळ, रविंद साबळे,रमेश आव्हाड, विश्वजीत साबळे, शंकर मानवतकर, महिला आघाडीच्या अध्यक्षा माहेश्वरी




साबळे, शिल्पा आव्हाड, अंजली साबळे, स्नेहल साबळे, कमलबाई आव्हाड, संगीता आव्हाड, राणी आव्हाड,शितल आव्हाड यांच्यासह पदाधिकाऱ्यांचे उपस्थिती होती.

या राज्याच्या मुख्यमंत्रीपदी लोकनेते आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी त्याची जबाबदारी स्वीकारावी त्याचबरोबर त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये बहुजन समाजाचं नेतृत्व करत असलेले विधान परिषदेचे आमदार आदरणीय अमितजी गोरखे सर यांची मंत्रिमंडळामध्ये निवड करण्यात यावी अशा प्रकारचा ठराव या ठिकाणी करण्यात आला. या ठरावाला सर्वांनी एकमुखाने संमती दिली.यावेळी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

संपादकीय

# हा छंद जिवाला...



माणसाचं जीवन अनेक घडामोडीनी व्यापलेलं असतं. अगदी जन्माला आल्यापासून त्याची सुरुवात होते. जसं जन्म कुणाच्या पोटी येईल, हे विधिलिखित असतं. सारं आयुष्य त्यानुसारच जगावं लागतं. लहानपणापासून एखाद्या गोष्टीची आवड, गोडी किंवा आकर्षण असणं म्हणजेच छंद. प्रत्येकाला कोणता ना कोणता तरी छंद असतो. त्या छंदातून चार सुखाचे, आनंदाचे क्षण मिळवता येतात. कुणाला वाचनाचा तर कुणाला लेखनाचा, कुणाला चित्र काढण्याचा तर कुणाला फोटोग्राफीचा, कुणाला फिरण्याचा तर कुणाला खाण्याचा, कुणाला जुनी नाणी, पोस्टाची तिकीटे, काडेपेट्या, निरनिराळ्या देशांच्या नोटा-नाणी किंवा वृत्तपत्रातील कात्रणे गोळा करण्याचा छंद असतो. अनेक वर्षांची मेहनत नि चिकाटीमुळे एक छान संग्रह जेव्हा तयार होतो, तेव्हा इतरांनाही होणारा आनंद पाहून समाधान वाटतं. एखाद्या छंदात गुंतवून ठेवणं अनेक दृष्टीने आनंददायी असतं.

या ठिकाणी मी माझा अनुभव सांगतो. काहींना तो मार्गदर्शक ठरेल अशी खात्री आहे. मी मूळचा अलिबाग तालुक्यातील चोंढी या छोट्याशा गावातला. माझ्या वयाच्या साठीपर्यंत मी तिथेच होतो नि आता नवी मुंबईत स्थायिक झालो आहे. लहानपणापासूनच माझं अक्षर सुंदर होतं. खरंतर सुंदर हस्ताक्षर ही मला दैवी देणगीच आहे! मी त्यासाठी ना कोर्स केला ना कुणाकडून शिक्षण घेतलं. माझा मीच गुरू झालो नि स्वत:च प्रयत्न करून आणखी सुधारणा करत गेलो. माझं शालेय-विद्यालयीन आणि महाविद्यालयीन शिक्षण, त्यानंतर नोकरीऐवजी वडिलोपार्जित दुकानदारी, लग्न, मुलंबाळं, त्यांची शिक्षणं, त्यांच्या नोकऱ्या, लग्नकार्यं, त्यांची मुलं अशा जीवनाच्या प्रवासात स्वतःचे छंद, आवडी-निवडी बाजूलाच पडल्या. अर्थात, छंद जोपासत असलो तरी त्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नव्हतो.

व्यवसायातून निवृत्ती घेतल्यानंतर मात्र पूर्णपणे छंदात गुंतवून घेतल्याने खूप आनंदी आहे. सुंदर हस्ताक्षराचा उपयोग करत सुलेखनाचेही प्रयोग करत गेलो ते यशस्वी ठरले नि लोकांनाही आवडू लागले. वाचनाबरोबरच कविता करणे, चारोळ्या करणे, लहानसहान लेखन आदी छंदांपैकी अक्षर छंद मला निवृत्त जीवन जगताना फार उपयोगी पडला. मी वयाची एकाहत्तरी पार केली असली तरी हस्ताक्षर आणि सुलेखनकार हीच माझी ओळख ठरत आहे. त्यात मी स्वत:ला इतकं गुंतवून घेतलंय की, वेळ कसा संपतो तेच कळत नाही...

जे जे आपणासी ठावे।
ते ते दुसऱ्यासी सांगावे।
शहाणे करुन सोडावे।
सकळजन..।।

असं एक वचन आहे. मला जे जे येतं ते मी विद्यार्थ्यांना, अक्षरप्रेमींना शिकविण्याचा प्रयत्न करतो. त्याला मिळणारा प्रतिसाद पाहून नवीन ऊर्जा मिळते. छंद माणसाला जगायला शिकवतात. जगणं सहज सोपे नि आनंददायी बनवतात. 'दिसामाजी काहीतरी लिहावे..' या उक्तीप्रमाणे मी रोज न चुकता काही ना काही लिहित असतो. मी आत्तापर्यंत अनेक डायऱ्यांमध्ये हजारो निरनिराळे सुविचार लिहिलेत. तसेच, पोस्टकार्डावर, पेपर बॅगांवर, टाकावू सीडींवर तर लिहिलं आहेच पण फुकट गेलेल्या लग्नपत्रिकांमधून सुंदर सुंदर भेटकार्ड तयार केली आहेत.

मला 'अक्षरविलास' या नावाने ओळखतात. माझ्या अक्षरछंदामुळेच अनेक मानमरातब, सत्कार व सन्मान मला प्राप्त झाले. त्याचबरोबर कवी नि चारोळीकार म्हणूनही वेगळी ओळख आहेच. शेवटी एक गंमत सांगतो. माझ्या वडिलांनी त्याकाळी सुरू केलेल्या 'न्यूज पेपर एजन्सी'मुळे पेपर वाचायचा, त्यातील कात्रणे जमवण्याचा छंद तर लागलाच पण लोकांच्या दारी जे पेपर मी नेऊन टाकत होतो त्याच पेपरमध्ये आज माझ्या कविता, चारोळ्या, लेख आणि सत्काराच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. म्हणून म्हणतो प्रत्येकाने कोणता तरी छंद जपावा.. जोपासावा.. वाढवावा.. त्यात रमावं आणि जीवनाचा आनंद उपभोगावा.

– विलास समेळ, घणसोली, नवी मुंबइ

# या युद्धाचा अंत कधी?

मागील वर्षी ७ ऑक्टोबरला 'हमास'ने गाझा पट्टीतून इस्रायलवर अनपेक्षित हल्ला करून काही यश मिळवले, अनेक इस्रायली नागरिकांना बंदिस्त करून ओलिस ठेवले आणि दुर्बळ प्रतिस्पर्धीसुद्धा बलाढ्य सत्तेचा प्रतिकार करू शकतो, हे जगाला दाखवले. इस्रायल याचे उत्तर देईल, याची शंका नव्हती; परंतु दोन्ही बाजूंनी किती नुकसान होईल याची कल्पना कोणालाच नसावी. युद्ध पेटून आता नऊ महिने झाले. इस्रायलने गाझा पट्टी बेचिराख केली. ८० टक्के रहिवासी बेघर झाले आणि ३७ हजार पॅलेस्टिनी ठार झाले. यात अधिकांश निष्पाप आबाल-वृद्ध आहेत. इस्रायलने काय साधले? हमासला ते नष्ट करू शकले नाही व त्यांचे भुयारी अड्डे अजूनही वापरात आहेत. शंभरहून अधिक इस्रायली नागरिक आजही ओलिस आहेत. दोन्हीकडून सामान्य नागरिकांच्या हालाची जाणीव न ठेवता मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे. जगणे असह्य झाले आहे आणि जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा वाढत आहे. जगाला याची जाणीव आहे; परंतु एकीकडे बेंजामिन नेतान्याहू व दुसरीकडे हमासचे आक्रमक नेतृत्व तडजोड करण्याच्या मनस्थितीत नाही. मग हा संघर्ष कसा संपेल?

पॅलेस्टाईन-इस्रायल संघर्ष नवीन नाही आणि तो मिटवण्यासाठी असंख्य करार झाले व दरवेळी निष्फळ ठरले. सध्याचा संघर्ष ऑस्लो करारापासून (१९९३-९५) सुरू झाला. सन १९९३मध्ये नॉर्वेच्या मध्यस्थीने अमेरिकेत इस्रायलचे पंतप्रधान यित्झाक राबिन आणि पीएलओ (पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन) प्रमुख यासेर अराफात यांच्यात करार झाला. पीएलओ इस्रायलचे अधिकृत अस्तित्व मान्य करेल व इस्रायल पॅलेस्टाईनला दोन वेगळ्या भागांत – गाझा पट्टी आणि वेस्ट बँक (जॉर्डन नदीच्या पश्चिमी भागाचा काही प्रदेश) – स्वतःचे शासन स्थापण्यास मान्यता देईल, असे करारात ठरले. अमेरिका यासाठी मदत व पाठिंबा देणार होती. याला 'टू-स्टेट सोल्युशन' म्हणतात. परंतु दोन्हींकडे एकमेकांवर विश्वासाचा अभाव आणि प्रामाणिकपणा अपवादाने होता. परिस्थिती गढूळ करायला इस्रायली ज्यू कट्टरवाद्याने राबिन यांचा खून केला. आधीच इस्रायलमध्ये 'ऑस्लो करार' वादग्रस्त होता आणि सन १९९६मध्ये कराराच्या विरोधातले बेंजामिन नेतान्याहू निवडून आले. इस्रायल आणि पीएलओ यांच्यात वादांचे अनेक मुद्दे होते व त्यात जेरूसलेम येथील अल-अक्सा मशिदीत येथे मुस्लिम नागरिकांना नमाज पठण करण्याची मुभा होती. सर्व सुरळीत चालू असताना इस्रायली नेते शेरॉन यांनी मुद्दाम पवित्र स्थानी मर्यादांचे उल्लंघन केले आणि संघर्ष चिघळला. त्यानंतर पॅलेस्टिनी उठावात हिंसाचार सुरू झाला आणि पॅलेस्टिनी मागण्यांना जगभर सहानुभूती मिळाली.उठाव होत असताना वेस्ट बँक आणि गाझा पट्टीत पीएलओचे तोकडे शासन होते; परंतु गाझा पट्टीत अस्थिरतेचा फायदा घेऊन हमास संघटनेने सत्ता बळकावली. वेस्ट बँकमध्ये अजूनही पॅलेस्टिनी शासन असले तरी ते वयस्कर, भ्रष्ट आणि निष्क्रिय नेत्यांच्या हाती आहे. इस्रायलने याचा फायदा घेऊन वेस्ट बँकमध्ये वसाहती केल्या. अशा गुंतागुंतीच्या राजकारणातून मार्ग काढणे अवघड आहे व त्यात हमासने गाझा पट्टीत आपली सत्ता कायम ठेवली आणि मागील वर्षी केलेला हल्ला हे त्यातलेच पुढले पाऊल आहे. आता पुढे काय, असा प्रश्न आहे. शेजारच्या अरब देशांची प्रतिक्रिया, इराणचे अंतर्गत राजकारण आणि हमासला पाठिंबा, तसेच आण्विक प्रकल्पाचा धोका आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निवडणुकीच्या वर्षात अमेरिकेची निर्णायक भूमिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची अध्यक्ष होण्याची दाट शक्यता... या सगळ्या मुद्द्यांची दखल घेणे आवश्यक आहे.अरब-इस्रायल संघर्षात सौदी अरेबियाची भूमिका मोलाची आहे. सौदी राजकुमार महम्मद बिन सलमान यांनी पुढाकार घेऊन अमेरिकेच्या मदतीने इस्रायलशी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. परंतु सौदी अरेबियाचे काही नागरिक हमास आणि इस्लामिक स्टेटला पैसे देतात. कदाचित, आपल्याला या संघटनांकडून उपद्रव किंवा पिळवणूक नको, म्हणून ते मदत करत असल्याची शक्यता आहे. आकाराने लहान पण अतिश्रीमंत कतारने आपले वेगळे धोरण चालू ठेवले आहे. अल जझिरा वाहिनीवर नियंत्रण ठेवण्यास त्यांनी नकार दिला. त्यांच्यातर्फेही दहशतवादी संघटनांना समर्थन मिळते.पश्चिम आशियात सर्व अरब देशांचा प्रमुख शत्रू इराण आहे. इराणची संस्कृती फार्सी आहे आणि शियाबहुल धर्मगुरूंचे शासन स्वतःचे धोरण चालवतात. त्यांचा हमासला आणि लेबननस्थित हेजबुल्ला दहशतवादी संघटनांना पाठिंबा आहे. इराणची अल कुद्स ही शासकीय पाठिंबा असलेली संघटना सर्व दहशतवादी संघटनांना मदत पुरवते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, इराणचा आण्विक प्रकल्प हा सर्व प्रदेशाला धोका आहे. इस्रायलही अण्वस्त्रसज्ज आहे आणि सर्व गुंतागुंतीच्या राजकारणावर अण्वस्त्रांची सावली वेगळा धोका उत्पन्न करते. इराणमध्ये उद्या नेतृत्वात बदल झाला तरी धोरण बदलण्याची शक्यता कमी आहे. परिस्थितीवर नियंत्रण ठेवू शकणारी अमेरिका ही एकमेव महासत्ता आहे. काही दिवसांपूर्वी इस्रायलचे संरक्षणमंत्री योआव गलांट अमेरिकेचा दौरा करून तेथील प्रमुख अधिकाऱ्यांशी चर्चा करून परतले. बायडेन इस्रायलला अधिक मदत करण्यास तयार नाहीत. काहीही ठरले तरी नोव्हेंबरमध्ये अध्यक्षीय निवडणुकीत कोण निवडून येईल, यावर सर्व अवलंबून राहील. डोनाल्ड ट्रम्प निवडून आले तर सर्व तर्क आणि समीकरणे बदलतील. तात्पर्य, पॅलेस्टिनी नागरिकांच्या व्यथा आणि हाल तूर्त तरी कमी होणार नाहीत.भारताने पश्चिम आशियातील विविध संघर्षांपासून दूर राहावे; कारण तेथील घडामोडींचा सध्या तरी आपल्या सुरक्षेला धोका नाही आणि कोणी मदत मागितल्याशिवाय आपण पुढाकार घेऊ नये. मात्र, प्रथम म्हणजे युद्ध सुरू करण्याआधी काय ध्येय असावे आणि साध्य करण्यासाठी काय करावे लागेल, किती नुकसान होण्याची शक्यता आहे व ते पेलण्याची क्षमता आणि त्याला लागणारा खर्च, अशा सर्व घटकांचा पूर्व विचार व्हावा. अनेकदा अनपेक्षित प्रसंग येतात. त्यासाठी संरक्षण मुख्यालयांने पर्यायी योजना तयार ठेवल्या पाहिजेत. आपल्या सीमांवरील तणाव हे वास्तव आहे; परंतु गरज पडली तर कसा प्रतिकार करावा यासाठी योजना तयार हवी व कुठच्याही आणीबाणीसाठी सज्ज राहिले पाहिजे. दुसरा मुद्दा म्हणजे हमास इस्रायली संघर्षात हमास अजून आपले अस्तित्व टिकवून आहे हे त्यांच्या बळाचे आणि समर्थनाची दृढता दर्शवते. भारतीय शांतिसेनेशी लढताना एलटीटीईने हेच केले होते. त्यांचा पराभव व्हायला नंतर वीस वर्षे लागली.तात्पर्य फक्त हिंसाचाराने राजकीय प्रश्न सुटत नाहीत. चर्चा, वाटाघाटी, तडजोड, हे राजनीतीचे पैलू आहेत व त्यांचा वापर झाला पाहिजे. अखेर, अल्पसंख्याक आणि दुर्बळ समाजाला मुख्य प्रवाहात समावेश करून घेतले तरच त्यांची गाऱ्हाणी दूर होऊ शकतात, नाहीतर हिंसाचाराला आमंत्रण देण्यासारखे आहे. शेकडो वर्षांपूर्वी आपल्याला 'चाणक्य नीती'ने हेच शिकवले आहे. दुसऱ्यांच्या चुकांपासून शिकणे हे आपल्या हिताचे आहे. अखेर समाजात एकजूट असली तर सर्व शक्य आहे.

# पोकळ आश्वासने

राजकीय नेते, मंत्री, खासदार यापैकी कुणीही कोणतीही आश्वासने देवोत, पडद्याआडून कागदावर सरकवलेल्या योजना मात्र शिरकाव करतातच. धारावीतील अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा ते स्पष्ट झाले आहे. मुंबईच्या पूर्व उपनगरातील मुलुंड येथे धारावीच्या अपात्र रहिवाशांचे पुनर्वसन करण्याचा मुद्दा लोकसभा निवडणुकीपासून गाजतो आहे. त्यापूर्वी मुंबईच्या विविध पायाभूत सुविधा उभारणीतील प्रकल्पग्रस्तांचे पर्यायी पुनर्वसन याच भागात करण्याचे निश्चित झाल्याने त्यास स्थानिकांकडून प्रचंड विरोध झाला होता. या प्रस्तावास हिरवा कंदील कुणाच्या काळात दिला गेला, यावर काथ्याकूट झाला.



आरोप-प्रत्यारोप झाले. परंतु, ही योजना काही कुणी परतवून लावू शकले नाही. रहिवाशांच्या आंदोलनाला वाटाण्याच्या अक्षताच दाखविल्या गेल्या. त्यानंतर धारावी प्रकल्पातील अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी मुलुंड-ठाणे येथील जकात नाक्याची जागा देण्याचे प्रस्तावित करण्यात आले. आश्चर्य म्हणजे राज्य सरकार बाजारभावाने मुंबई महापालिकेकडून ही जागा विकत घेऊन त्यावर धारावीतील अपात्रांचे पुनर्वसन करणार आहे. निवडणुकीत हा मुद्दा अंगलट येईल, असे लक्षात येताच सर्व उमेदवारांनी आणि खास करून भारतीय जनता पक्ष व शिंदेप्रणित शिवसेनेनेही धारावीकरांचे मुलुंडमध्ये पुनर्वसन होणार नाही, असे निक्षून सांगितले, मात्र आता पुन्हा एकदा मुंबई महापालिका जकात नाक्याचा भूखंड यासाठी राज्य सरकारला देण्यास तयार असल्याचे उघड झाले आहे. पात्र किंवा अपात्र या सर्वांना त्यांच्या व्यवसायाच्या स्वरूपामुळे तेथेच वसविले जावे, असा धारावीकरांचा कायम आग्रह राहिला आहे. त्यातल्या त्यात तेथून थोडे जवळ म्हणजे वडाळा येथे धारावीतील अपात्रांचे पुनर्वसन करण्यात येईल, असेही सांगण्यात आले. याचाच अर्थ काय तर, याबाबतीत कुणाचा कुणाला पोस नाही. धारावीत नेमके पात्र किती, अपात्र किती, याचा लेखाजोखा अजून समोर आलेला नाही. प्रकल्पनिश्चिती होईपर्यंत यातल्या अपात्रांची संख्या वाढणार नाही, याची हमी कोण देणार? मुंबई शहरातील प्रत्येक उपनगराची क्षमता किती, त्यासाठी कोणत्या पायाभूत सुविधा लागतील, एखाद्या प्रकल्पातील बेकायदा रहिवाशांचा किंवा सरकारी जागांवर अतिक्रमण करून राहणाऱ्यांचा भार अन्य परिसरातील रहिवाशांनी सोसत रहायचा का, हे प्रश्न कधीतरी धसास लावावे लागतीलच. सर्व जनतेला मुंबईत सामावून तर घ्यावे लागेलच, परंतु धनिकांचे परिसर छान छान हिरवेगार, अतिक्रमणमुक्त आणि मध्यमवर्गीय-गोरगरीब जनता राहते, तेथे अधिकाधिक भार. या विरोधाभासाचे कुणालाही काही पडलेले नाही.

# व्यवस्था परिवर्तनाचे आव्हान

आजमितीला भारत व जगासमोरील सर्वोच्च आव्हान काय आहे? याचे शास्त्रशुद्ध उत्तर आहे, हवामान बदलामुळे दररोज उग्र होत असलेले अरिष्ट. सोबतच मोठ्या लोकसंख्येची दैन्यावस्था; मानव अधिकाराचे होत असलेले हनन, हिंसा व शोषण. निसर्ग व्यवस्थेवर होत असलेला अनाठायी कुठाराघात आणि कष्टकरी जनसमूहांवर त्याचे होत असलेले विपरीत परिणाम. निवडणुकांच्या रणधुमाळीत जीवनमरणाचे मुख्य प्रश्न केंद्रस्थानी नाहीत, ही अत्यंत खेदाची बाब आहे. मग हा सर्व महाखटाटोप कशासाठी व कुणासाठी चालला आहे?

राज्यकर्ते वर्गजाती विकासाच्या गोंडस नावाने विध्वंस करत राहतात! कष्टकरी जनतेचे शोषण कमालीचे वाढते. आजघडीला भारतात ७० टक्के जनता – म्हणजे तब्बल १०० कोटी लोक अत्यंत हलाखीचे, अमानवीय व अभावग्रस्त जीवन जगण्यास मजबूर आहेत. ही एक मोठी विसंगती आहे की, ज्या संविधानिक संरचनेच्या आधारे हा राज्यशकट चालतो किंवा चालविला जातो, त्यांच्या केंद्रस्थानी 'आम्ही भारताचे लोक' आहोत. संविधान हे सर्वोपरी असून ते मोडीत काढले जाऊ नये म्हणून २०२४च्या लोकसभा निवडणुकीत तो कळीचा मुद्दा बनला. संविधानाने राज्याच्या तिन्ही मोक्याच्या संस्था व व्यवस्थांना भारतीय जनतेच्या सकल ऐहिक हिताचे दायित्व सोपवले आहे. दरएक भारतीयास मानवी प्रतिष्ठेचे आणि सर्व जीवनावश्यक बाबींच्या पूर्ततेचे अभिवचन अधोरेखित केले आहे. भरणपोषणच नव्हे, तर एकंदर योगक्षेम, सर्जन व उन्नयनाची ग्वाही दिली आहे. विशेष म्हणजे, त्यासाठी देशातील नैसर्गिक, मानवी व अन्य संसाधनांचा व्यापक जनहितार्थ विनियोग करण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडील एका महत्त्वपूर्ण निकालात ही बाब अधोरेखित केली आहे. मात्र, मुख्य प्रश्न असा आहे, की त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही कोण व कशी करणार?

पंतप्रधान मोदीजी उठता बसता म्हणतात, की भारताला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करायची; २०४७ साली 'विकसित भारत' करायचा! म्हणजे मूर्त स्वरूपात काय तर घरोघर चारचाकी, सर्वांना विमानप्रवास, चंगळवादी जीवनशैली, पंचतारांकित पर्यटन; जसे की सध्याचे विकसित अमेरिका, युरोप खंडातील देश जपान येथे होते. एवढेच काय, आपल्या देशातील १० कोटी लोक सध्या मस्तवालपणे या तमाम हायटेक वस्तू व सेवा उपभोगतात, हे सर्व महाजन, अभिजन विकसित जगाचा भाग आहेत. थोडक्यात, ही १० टक्केंची चैनचंगळ व ९० टक्केची दैना, वंचना व्यवस्था अशीच चालू ठेवणे, शहाजोगपणे त्याला विकास म्हणणे! जो कोणी या विकास दहशतवादाला विरोध करेल त्याला देशद्रोही ठरवून त्यांचा छळ, मुस्कटदाबी करणे हे प्रकार राजरोस चालले आहेत. कहर म्हणजे आता याचे बिंग फुटले असून सामान्य जनतेने त्यांच्या धुव्रीकरण चलाखीचा दंभस्फोट केला आहे. खचितच ही दिलासा देणारी, नवदिशा सूचन करणारी बाब आहे. हडेलहप्पी करायला गोदी मीडियाही होता व आहेच; मात्र, त्यांची लक्तरे चव्हाट्यावर आली आहेत! उपरिनिर्दिष्ट पार्श्वभूमी व परिप्रेक्ष्य लक्षात घेत भारताच्या विदारक स्थितीची काही ठळक तथ्ये पाहणे सयुक्तिक होईल. मानव विकास निर्देशांकात १९१ देशांत भारताचा क्रमांक १३४ वा, तर १२५ देशांच्या भूक निर्देशांकात भारत ११४व्या स्थानी आहे आणि १८० देशांच्या पर्यावरण कार्यक्षमता निर्देशांकात आपल्या देशाचे स्थान तळाशी १८०व्या क्रमांकावर आहे. हवा व पाणी गुणवत्ता निर्देशांकातदेखील आपली स्थिती अत्यंत खराब आहे! लोकशाहीची स्थिती व माध्यम स्वातंत्र्याबाबत भारताची अवस्था लाजीरवाणी, एकाधिकारशाही राष्ट्राच्या रांगेत आहे. हे सर्व प्रगत लोकशाही व्यवस्थेचे खचितच लक्षण नाही. आगामी काळात भारताच्या राष्ट्र व संस्कृती म्हणून असलेल्या संकल्पनेच्या दृष्टीने हे कळीचे मुद्दे असून त्याचा सम्यकपणे विचार करणे, संस्थात्मक पाया बळकट करणे हे मुख्य आव्हान आहे. पंतप्रधान मोदी म्हणतात, 'प्रत्येक भारतीय कुटुंबाच्या दारात मोटारगाडी'कडे भारत झपाट्याने आगेकूच करत आहे. हवाई वाहतूकीचे अग्रगण्य केंद्र म्हणून भारत प्रगती करत आहे. आता चीन नाही, तर भारत 'जगाचा कारखाना' म्हणून झेप घेतो आहे. परकीय भांडवल गुंतवणुकीसाठी भारत हे विशेष पसंती स्थान आहे. विकसित भारताचा बोलबाला यासी निगडीत काही इतर पैलू बघू या. भारत हा आज सर्वाधिक शस्त्रास्त्रे आयात करणारा देश आहे. जीवाश्म इंधनाच्या आयात करणाऱ्या देशांत भारत प्रमुख स्थानी आहे. गेली काही वर्षे आपण दरसाल १२ ते १५ लाख कोटी रुपये पेट्रोलियम पदार्थांच्या आयातीवर खर्च करतो. भरीस भर सोने आयातीतही आपण पहिल्या, दुसऱ्या क्रमांकावर कायम असतो. एवढेच काय कृषिप्रधान देश असूनही खाद्यतेल व डाळीच्या आयातीवर दरवर्षी दीडदोन लाख कोटी रुपये खर्च करतो! हा सर्व विकास आहे की विनाश व विकृती? हवा, पाणी व अन्न प्रदूषित करणे, विषाक्त करणे, पर्यावरणाची ऐसीतैसी करणे, परिस्थितिकी संरचना उद्ध्वस्त करणे याला विकास मानणे हा तद्दन बालीशपणा नव्हे तर काय? तात्पर्य, सत्ताधारीच नव्हे, तर सर्वच राजकीय पक्षांनी याचा मूळातून फेरविचार करणे अत्यावश्यक आहे.

नैसर्गिक व मानवी संसाधने (लॅन्ड अन्ड लेबर) ही देशांची पायाभूत संरचना आहे. स्वातंत्र्यापूर्वी वासहातिक राजवटींनी त्यांची प्रचंड लूट-बरबादी केली. त्याआधी सरंजामी-भांडवली व्यवस्थेने निसर्ग व श्रमशक्तीचे चुकीचे दोहन व शोषण केले. स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिकीकरण, औद्योगिकरण, शहरीकरणासाठी ती प्रक्रिया अव्याहतपणे चालू ठेवली. समाजवाद व संमिश्र अर्थव्यवस्थेच्या काळातदेखील तेच निसर्गविरोधी धोरण चालू राहिले. १९९१च्या उदारीकरण धोरणाने त्याला अभूतपूर्व गती दिली गेली. मोदी सरकारने गत १० वर्षांत, मागच्या शंभरेक वर्षात झाली नाही, तेवढी धूळधाण भन्नाट वेगात चालवली आहे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत, कच्छपासून कामरूपपर्यंत सर्वत्र निसर्गाची बेदरकारपणे लूट होत आहे. रस्ते, वीज, बंदरे, विमानतळे व अन्य प्रकल्प बांधकामांना प्रचंड गती देण्याची स्पर्धा आहे. पर्यावरणीय आघात व मूल्यमापन अटी शिथील – व काही बाबतीत चक्क रद्द करण्यात आल्या आहेत. परिणामी देशात पर्यावरणीय संकट ओढवले आहे. भूस्खलन, चक्रीवादळे, महापूर, उष्णतालहरी, वणवे, दुष्काळ, हिमनद्या वितळणे, समुद्रपातळी वाढणे, जैवविविधता घटणे आदी संकट मालिका दररोज उग्र होत आहे. हवामान अरिष्ट दिवसेंदिवस अधिक जाचक होत असून देशात हवामान आणीबाणीची स्थिती ओढवली आहे. या सर्व बाबींची गांभीर्याने नोंद घेऊन परिमार्जन करण्याऐवजी नवनवे विनाशकारी प्रकल्प हाती घेतले जात आहेत. देशी-विदेशी भांडवलदारांना नैसर्गिक संसाधनाची सर्रास लूट करण्याची मुभा देण्यात आली आहे. सोबतच श्रमिकांची चरितार्थ साधने हिरावून घेत त्यांना देशोधडीला लावले आहे. स्थलांतर, असुरक्षित व अनिश्चीत काम, अल्पवेतन यावर सध्याचा विकास डोलारा अवलंबून आहे. विकासाचे प्रचलित-प्रस्थापित-प्रभावशाली जागतिक प्रारूप – जे पूर्णत: विनाशकारी आहे – ते अवलंब करण्यास आपण 'विकसित भारत' करणे मानतो. हा विकासमार्ग जागतिक स्तरावर गोत्यात आला असून संयुक्त राष्ट्राच्या सरचिटणीसाने नि:संदिग्ध शब्दात बजावले आहे, की येत्या पाच वर्षांत जीवाश्म इंधनाला संपूर्ण आळा घातला नाही तर तापमान वाढ औद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसवर पोहोचून महाभीषण संकट अटळ आहे.गत काही दशकांत भारत ही जगात सर्वांत वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था झाली असून भारतात तापमानवाढ व प्रदूषण पातळी शिगेला पोहोचली आहे. तरी आपले धोरणकर्ते 'विकास' जयघोष चालू ठेवतात. महात्मा गांधी यांनी भारताला व जगाला, हावहव्यासापासून दूर राहण्याला खरा विकास माना, असे सन १९०९मध्ये 'हिन्दस्वराज्य' या त्यांच्या पथदर्शी ग्रंथात बजावले होते. आपण त्यांच्या आचारविचारांचा अव्हेर करून मोठी घोडचूक केली. भारतीय संस्कृतीचे स्वत:ला रक्षक म्हणवणाऱ्या संघ व मोदीजींना गांधी हे भारतीय आचारविचाराचे मूर्तिमंत प्रतिक आहेत, हे का कळत नाही? गांधी नाही चालत, तर निदान टागोर, विवेकानंद व दीनदयाळ उपाध्याय यांनी जे सांगितले त्याचा ते का विचार करत नाहीत? 'वसुधैव कुटुंबकम'चा इत्यर्थ निसर्गाशी तादात्म्य राखत जगणे हा आहे.भारतातील इमानदार लोकांनी एक संकल्प करणे अत्यावश्यक आहे, की यापुढे कुठल्याही नैसर्गिक व मानव संसाधनाची धूळधाण व शोषण केले जाणार नाही. गावागावात, मोहल्ल्यामोहल्ल्यात उभे राहून देशातील उर्वरित नैसर्गिक संसाधनांचे रक्षण व संवर्धनासाठी जनतेने एकजुटीने प्रयत्न व कृती करणे ही आज भारतमातेची आर्त हाक आहे. 'कसेल त्याचीच जमीन' आणि तोच शेतकरी, मच्छिमार, वनकामगार, बांधकामगार, घरकाम करणारे व अन्य सर्व कष्टकरी जनता यांनी तमाम प्रचलित विनाशकारी 'विकास प्रक्रियेला' ठाम विरोध करणे, हा आजचा राष्ट्रधर्म व युगधर्म आहे. शाहू-फुले-गांधी-आंबेडकरांच्या जीवनकार्याने, आचारविचाराने पावन झालेल्या महाराष्ट्राने आगामी विधानसभा निवडणुकीत या प्रश्नांवर आम सहमती घडवून समतामूलक शाश्वत विकासाचा एल्गार करून लोकसभा निवडणुकीतील प्रस्थापितांविरुद्धच्या जनादेशाची बूज राखत नवमहाराष्ट्राचा संकल्प केला पाहिजे. दलित-श्रमिक बहुजनांच्या मतांची पूर्ण एकजूट करण्यात जी उणीव लोकसभेच्या वेळी राहून गेली, तिला जाणीवपूर्वक दुरुस्त करण्यासाठी पुढाऱ्यांनी आपले आग्रह सोडून विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी केली तर महाराष्ट्र हा परिवर्तनात अग्रेसर ठरेल. त्यासाठी निसर्ग व श्रमजनविरोधी विकासाला कायमची सोडचिठ्ठी दिली पाहिजे.

# निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील यांच्या वर संशय,आ.राम शिंदे सह भाजपाचे गंभीर आरोप

**कर्जत (प्रतिनिधी)**

कर्जत जामखेड मतदारसंघाच्या मतमोजणी कक्षात मतदार संघाबाहेरील लोकांना उमेदवार प्रतिनिधी म्हणून कशी परवानगी दिली, याशिवाय इतर ही प्रश्न उपस्थित करत भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील यांच्या कामकाजावर प्रश्न चिन्ह उपस्थित केले असून याकडे जिल्हाधिकारी व निवडणूक आयोग गांभीर्याने लक्ष देणार का असा प्रश्न उपस्थित करत लवकरच या सर्व प्रश्नांना एकत्रित करत रिटयाचिका ही दाखल करनार आहोत असे मत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले.कर्जत जामखेड मतदार संघात संपूर्ण निवडणुकीत हाय व्होल्टेज ड्रामा पहावयास मिळाला यादरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अत्यंत पारदर्शक काम करणे आवश्यक होते मात्र २२७ कर्जत जामखेड मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि तीन पाटील यांनी संशयास्पद व पूर्वग्रह दूषित काम करत भाजपाला योग्य पद्धतीने न्याय दिला नाही असा गंभीर आरोप आमदार प्राध्यापक राम शिंदे यांच्यासह भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे यांनी केला आहे.

कर्जत येथे मतदानयंत्र ठेवलेल्या स्ट्राँग रूमच्या बाहेर मतदारसंघाच्या बाहेरील बारामती ऍग्रोच्या व आ. रोहित पवार यांच्या कर्मचाऱ्यांना परवानगी कशी देण्यात आली. याबाबत भाजपाच्या कार्यकर्त्यांनी फिल्मी स्टाईल बेकायदेशीर पोलीस ड्रेस घातलेल्या व्यक्तींना उघडे पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांची परवानगी रद्द का करण्यात आली. याशिवाय निवडणूक काळात मतदानाच्या दिवशी मतदारसंघात बारामती ऍग्रोचे कर्मचारी तर चौफेर फिरत होते त्यावर कारवाई का करण्यात आली नाही. यात काही कर्मचारी तर गैरप्रकार करताना ही सापडले तरी याकडे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गांभीर्याने का पाहिले नाही असा प्रश्न उपस्थित केला.



मतमोजणी प्रसंगी रोहित पवार यांचे उमेदवार प्रतिनिधी म्हणून मतदारसंघाच्या बाहेरचे बारामती ऍग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, बारामती ऍग्रो चे संजय सस्ते, ऍड.योगेश सदामते (बारामती) व अजून एक बारामतीचा इसम यांना निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील यांनी मतमोजणी कक्षात परवानगी कशी दिली? मतमोजणीच्या निकालामध्ये अनेक बेरजामध्ये गोंधळ आणि बेरीज बरोबर नसल्याने आ. राम शिंदे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांना फेरमोजणीचा अर्ज दिला त्या अगोदर पोटरे यांनी स्वत: दोन वेळा अर्ज देण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी गांभीर्याने दखल न घेता अर्ज स्विकारले नाहीत.शेवटी विजयी उमेदवार जाहीर करण्या अगोदर फेर मतमोजनीचा अर्ज घ्यायला पाहिजे होता मात्र आ. राम शिंदे यांनी असा फेर मतमोजणीचा अर्ज देण्या अगोदरच निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर विजयी उमेदवार जाहीर ही केला व नंतर आमदार राम शिंदे अशा विविध घटना प्रसंगी नितीन पाटील यांची वागणूक अतिशय संशयास्पद दिसत होती. असा आरोप पोटरे यांनी केला आहे. महाराष्ट्रात अनेक मतदारसंघात दिलेले फेर मोजणीचे अर्ज मंजूर होऊन निकाल ही वेगळे लागले यामध्ये नाना पटोले, अब्दुल सत्तार यांच्या निकालात बदल झाला मग कर्जत जामखेड मतदार संघातच दूजाभाव का..? निवडणुकीत जय पराजय तर होणारच परंतु या गंभीर गोष्टींची वरिष्ठ प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. सबंधीत प्रशासनाने व वरिष्ठ यांनी या प्रमुख गंभीर प्रकरणांची व इतर गैरप्रकारांची गांभीर्याने चौकशी करून जनतेसमोर खुलासा करून योग्य ती कारवाई करावी...!!! असे आवाहन भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे यांनी करत लवकरच या सर्व प्रश्नांना एकत्रित करत जिल्हाधिकारी याचे कडे तक्रार करून रिटयाचिका ही दाखल करनार आहोत असेही म्हटले आहे.

# कुटुबीयांनी शिक्षाधीन व न्यायाधीन बंद्यांप्रती सहिष्णुता बाळगावी: मा.श्रीमती अंजु शेंडे




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर, अहमदनगर जिल्हा कारागृह, वर्ग-२, यांच्या संयुक्त विदयमाने मंगळवार, दिनांक २६/११/२०२४ रोजी नव विद्या प्रसारक मंडळाचे सुलोचना सुधाकर भोपे सभागृहामध्ये राष्ट्रीय विधी सेवा सप्ताह अंतर्गत बंद्याच्या कुटुंबियांसाठी कायदेविषयक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती अंजु शेंडे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर या होत्या. यावेळी बोलतांना त्यांनी, कुटुबीयांनी बंदी बांधवांच्या पुनर्वसनासाठी, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील राहावे त्यांच्या प्रती सहिष्णुता बाळगून नवे आयुष्य जगण्यासाठी त्यांना प्रेरणा द्यावी, असे प्रतिपादन केले. तसेच तुरुंगात राहूनही बंदी शिक्षण घेऊ शकतात. कौशल्यआधारित शिक्षण घेऊ शकतात, जेणेकरून भावी आयुष्यांत त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येते अशी माहिती दिली.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव, भाग्यश्री का.पाटील यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध योजना, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कामकाज या विषयी माहिती दिली. तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचा टोल फ्री क्रमांक १५१०० या विषयी सांगितले. ड. सागर पादीर यांनी बंदी जणांच्या कायदेशीर हक्काबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन ड. राजाभाऊ शिर्के, यांनी केले. या कार्यक्रमास जिल्हा कारागृहाचे अधीक्षक, श्री. सुनील वानखेडे, प्राचार्या, महर्षी ग.ज. चीतांबर विद्या मंदिर, श्रीमती. विभावरी रोकडे, लोक अभिरक्षक कार्यालयाचे विधिज्ञ ड. जरजरी बक्ष शेख, ड. कश्यप तरकसे, ड. मच्छिद्र देठे, ड. वैभव बागुल इत्यादी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करणेकामी अहमदनगर जिल्हा कारागृह, वर्ग-२, कर्मचारी आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठीचे सबळीकरण होईल-परशुराम पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याप्रकरणी 'अभिजात मराठी भाषा समिती'चे सदस्य आणि मराठी भाषा संचालनालयाचे माजी संचालक श्री. परशुराम पाटील यांचा विशेष सत्कार मुंबई येथील नरेवाडी विकास मंडळ आणि धनलक्ष्मी पतसंस्था यांच्या वतीने लोअर परेल मुंबई येथील बीडीडी चाळ मधील बुद्ध विहार हॉलमध्ये करण्यात आला.



यावेळी बार कौन्सिलचे सदस्य सुभाष घाडगे, धनलक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष हरिश्चंद्र गोविळकर, उपाध्यक्ष लक्ष्मण पाटील यांसह शंकर पवार, बाळकृष्ण कदम, अधिवक्ता दीपक निलवे, संजय रणदिवे, विक्रम कोकितकर इत्यादी पदाधिकारी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील मुंबई निवासी मराठी भाषाप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असतांना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्याविषयीचा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठवण्यासाठी मराठी भाषातज्ञांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या काही बैठकींना उपस्थित राहून श्री. परशुराम पाटील यांनी मार्गदर्शन केले होते. सत्काराला उत्तर देताना परशुराम पाटील, माजी संचालक, मराठी भाषा संचालनालय यांनी आपले मनोगत व्यक्त केले की, अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठीचे सबळीकरण होईल. मराठीतील प्राचीन वाङ्मयाचा अन्य भाषेत अनुवाद होईल. मराठी भाषेत संशोधन करणाऱ्यांना 'स्कॉलरशिप' दिली जाईल. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांचा अभ्यास आणि संशोधन होईल. महाराष्ट्रातील १२ सहस्र ग्रंथालयांचे सशक्तीकरण करण्यासाठी अनुदान दिले जाईल. भारतातील ४५० विद्यापिठांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन केले जाईल. व्यवसाय मिळवून देणारी 'अर्थार्जनाची भाषा' आणि उच्च शिक्षण देणारी 'ज्ञानभाषा' असा मराठीचा विकास होऊ शकेल.

# सावळविहिर बुद्रुक येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील सावळीविहीर बु येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात, मंगळवार (दि.२६) रोजी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री तुपे सर यांच्या हस्ते संविधान दिनानिमित्त राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानिमित्ताने शिक्षकवृंद आणि सर्व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन केले. यावेळी कु.संघमित्रा पवार, कु.कल्याणी कुंभारकर, कु.अक्षरा पवार , चि. सिद्धार्थ पवार यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ.डहाळे पी. डी. यांनी संविधानातील अंतर्भूत हक्क आणि कर्तव्ये याबाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक आदरणीय श्री तुपे एस. एम. सर, ज्येष्ठ शिक्षक श्री. डुंबरे आर.ए., सौ. डहाळे पी. डी.,श्री. म्हस्के ए.जे, श्री. काळेगोरे एम.बी, श्री. खेडकर बी.आर, श्री. खान आय. आय., श्रीमती कानडे एम.पी. सौ. भामरे एम.आर., श्री. वाकचौरे ए.ए., श्रीमती शिंदे एम.डी उपस्थित होते. श्री. खेडकर बी.आर. यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक करून आभार मानले.

# निवडणुकीच्या विजयामध्ये शिवसैनिकांचा मोठा वाटा-आ.संग्राम जगताप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे चांगले सहकार्य मिळाले. शिवसैनिकांनी चांगली कामगिरी बजावली असून, विजयामध्ये शिवसैनिकांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्रासह जिल्ह्यात महायुतीच्या उमेदवारांना मोठे यश मिळाले. मोठ्या संख्येने उमेदवार निवडून आले. शहर मतदारसंघात काम करताना महायुतीच्या सर्व घटक पक्षांना बरोबर घेऊन सामाजिक प्रश्न व राजकीय भूमिका एकत्रितपणे घेणार असल्याची भावना आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली. तर शिवसैनिकांनी खांद्याला खांदा लावून केलेल्या कामाबद्दल आभार मानले.



नगर शहर विधानसभा मतदार संघात मताधिक्याने निवडून आल्याबद्दल महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शहर प्रमुख सचिन जाधव, भिंगार शहर प्रमुख सुनील लालबोंद्रे, अनिल लोखंडे, रवींद्र लालबोंद्रे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, अभिषेक भोसले, युवा सेनेचे शहर प्रमुख महेश लोंढे, अमोल हुंबे, पोपट पाथरे, आशिष शिंदे, विनोद शिरसाठ, सुनील भिंगारदिवे, अविनाश भिंगारदिवे, ओंकार शिंदे, महिला आघाडीच्या पुष्पाताई येलवंडे, तृप्ती साळवे, बहुले ताई, सलोनी शिंदे, विराज जाधव, रोहित पाथरकर, पांडुरंग घोरपडे, अक्षय कोंडवार, प्रथमेश बाचकर, सचिन गायकवाड, तात्या रासकर, सागर काळे ओमकार थोरात, बापू मोरे, सचिन राऊत आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सचिन जाधव म्हणाले की, आ. जगताप यांना निवडून आणण्यासाठी शिवसैनिकांनी मनापासून कार्य केले. प्रत्येक प्रभागातून व प्रत्येक परिसरात शिवसैनिकांनी या विजयासाठी खारीचा वाटा उचलला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी जिल्ह्यात शिवसैनिकांनी अहोरात्र परिश्रम घेतले. सर्वांनी केलेल्या कष्टाचे हे फळ आहे. जगताप यांना शहरात मोठे मताधिक्य मिळाले, त्यांना मंत्रिपद मिळावे ही नगरकरांची व शिवसैनिकांची इच्छा असल्याचे सांगितले. तर त्यांच्या मोठ्या सन्मान सोहळ्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# संस्कृती आणि धर्म टिकवा-चंद्रकात मोरे

**अकोले । प्रतिनिधी**

संस्कृती टिकली तर धर्म टिकेल, पण धर्म टिकवण्यासाठी मुले संस्कारक्षम बनवली पाहिजे, संस्कारी मुलेच संस्कृती टिकवतील त्यासाठी मुलांना आई वडिलांची सेवा करण्याची शिकवण दिली पाहिजे असे मत श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरी चे गुरुपुत्र युवा संत चंद्रकांत दादासाहेब मोरे यांनी व्यक्त केले. अकोले तालुक्यातील मेहंदुरी येथे श्री स्वामी समर्थ मंदिर दरबार स्थापना दिनानिमित्त तालुकास्तरीय भव्य सत्संग मेळाव्यात दादासाहेब मोरे यांनी आपल्या अमृततुल्य वाणीतून भाविकांशी हितगुज साधले. अकोले चे आमदार डॉ किरण लहामटे, अगस्तीचे संचालक अशोक आरोटे, आदी मान्यवर उपस्थित होते.

धर्माला ग्लानी येते तेव्हा देव अवतार घेतात, आज धर्म टिकवण्याची गरज असून ती आपली जबाबदारी आहे. त्यासाठी पुढील पिढ्या संस्कारीत बनवायला पाहिजे, आई वडिलांच्या सेवा करण्याची शिकवण त्यांना दिली पाहिजे, देवाची सेवा करून देव मिळेल की नाही हे सांगता येत नाही, परंतु आई वडिलांनाची सेवा केली तर देव नक्की मिळेल, अनाथ आश्रम, वृद्ध आश्रम बंद करायचे असेल तर मुलांवर संस्कार च






महत्वाचे आहेत. वृद्धाश्रमात शेतकऱ्यां चे आई वडील नाही ही अतिशय सुखकारक गोष्ट आहे. शेतकरी वर्गाने संस्कार टिकवले आहेत. असे प्रतिपादन दादासाहेब मोरे यांनी केले.दादासाहेब मोरे बोलताना म्हणाले की, जेथे विज्ञान संपते तेथे अध्यात्म सुरु होते, जो भाविक स्वामी चे चिंतन करतो तो चिंता मुक्त होतो, जेथे सगळे असमर्थ ठरतात तेथे फक्त स्वामी समर्थ ठरतात. जात, पात, धर्म, पुरुष, महिला असा कोणताही भेदभाव न करता त्यांचे दुःख निवारण विनामूल्य केले जाते असे केंद्र गावोगावी उभारून प्रत्येक घरात सेवेकरी निर्माण करायचा असल्याचे ही मोरे दादा यांनी सांगितले. कार्यक्रम यशश्वी करण्यासाठी तालुका निरीक्षक प्रमोद वाकचौरे, जे. के. मालुंजकर, जगन्नाथ देशमुख, गणेश मादास,रामदास बोंबले,सविता कोटकर, प्रतीक्षा पावडे, सरपंच अमित येवले, तसेच केंद्रातील सर्व सेवेकऱ्यांनी विशेष प्रयत्न केले आहे.तसेच प्रचार प्रसार साठी मादास आवाज गणेश मादास, लाईट डेकोरेशन साठी भूषण आरोटे यांनी विशेष सहकार्य केले.यावेळी खूप मोठया संख्येने भाविक उपस्थित होते.

# ऊसतोड कामगाराची पोरगी झाली अधिपरिचारिका

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून २५-३० किलोमीटरच्या अंतरावरत वसलेलं वैद्यकिन्ही हे गाव खरंतर दोन -तीन हजार लोक वस्तीच गाव.त्याच गावात ज्ञानोबा पारवे आणि सुशीला पारवे हे दांपत्य राहत. आयुष्याला अठराविश्व् दारिद्र्य लाभलेलं असताना.आपल्या विचारात शिव,शाहू,फुले,आंबेडकर यांचे विचार आणि कार्य रक्तात मिसळून घेणाऱ्या आणि चळवळीत अगदीच भाग घेऊन अन्यायाला वाचा फोडणारे हे कुटुंब.ऊसतोड कामगार कधी कोल्हापूर,कधी सांगली तर कधी सातारा या ऊस असलेल्या शहरात हे कुटुंब आपल्या चार छोट्या चिल्या पिल्यांना घेऊन त्यांना जगवण्यासाठी चाललेली ही धडपड.बाबासाहेब नेहमी म्हणायचे तुम्हाला चांगला माणूस बनायचं आणि बनवायचा असेल तर शिक्षण घेतलं पाहिजे आणि हेच वाक्य आपल्या उराशी बाळगून त्यांनी कष्टाला पोरांच्या शिक्षणाला कधीच काहीच कमी पडू दिल नाही. एक एक दिवस उपाशी पोटी काढला पण पोरांचं शिक्षण थांबवलं नाही.बघता बघता घरातील चार ही पोरांना चांगल शिक्षण दिलं पोराला ग्रॅज्युएट केल.तिन्ही पोरींच नर्सिंग पूर्ण केलं.पोरांनीही आईचा आणि बापाचं कोयता बंद करायचं हे ध्येय मनाशी या चार भावंडांनी बाळगून उंच झेप घ्याची ठरवली.आणि बाबासाहेबांच्या शब्दा आपण प्रमाणे आपण शहरात गेलो पाहिजे आणि मग यांनी थेट मुंबई गाठली.हॉस्पिटल जॉईन केलं.कोविड सारख्या जीव घेण्या काळात त्यांनी माणुसकी आणि देश वाचवला.दिवस उजाडत गेला रोज उगवणाऱ्या सूर्याला चॅलेंज दिल गेलं.ध्येय वेड्या मनात फक्त एकच जिद्द होती ती म्हणजे गव्हर्नमेंट सर्विस आणि इथल्या शोषित पिढीत लोकांची आपल्या हातून सेवा व्हावी.झोपडीतल्या लोकांना आरोग्य द्यावं त्यांची सेवा करावी.आणि इथल्या बहुजनासाठी आपलं आयुष्य खर्च करावं हेच एक उद्दिष्ट घेऊन मग सुरु झालं अभ्यास.

यातच घरातून चळवळीची शिकवण लाभलेली असतानाच.वाचनात आले इथले संत ज्यांनी माणुसकीची व्याख्या सांगितली.त्यानंतर अनेक पुस्तक हातात पडत गेलीत. शब्दाला धार लागली आणि सुरु झाला साहित्य प्रवास.

आईच बाबाच दुःख,समाजाच दुःख आपल्या लेखणीतून जगाला सांगावं त्यासाठी आपण लिहिलं पाहिजे बोललं पाहिजे. आणि मग काय बघता बघता तो विद्रोहाचा ज्वालामुखी संत तुकोबा,नामदेव ढसाळ नसानसात कधी आला ते समजलंच नाही. मग काम आणि कवी संमेलन आंदोलन हे चालूच झालं.मुंबई असो नाहीतर दिल्ली असो अन्याय झालेल्या लेकींच्या मागे उभ राहीलच पाहिजे हीच बंडाची आरोळी देऊन काम चालू झालं.आपल्या नोकरीवरती अतोनात प्रेम करून आपलं कष्ट प्रामाणिक आहे.हे सिद्ध झालं पाहिजे.आणि आपल्याला कायमची गव्हर्मेंट नोकरी पाहिजे म्हणजे समाजासाठी हातभार लावता येईल.याच विचारानं गव्हार्मेंटची परीक्षा देण्याचा विचार बाळगून कधी चार तास तर कधी पाच तास अभ्यास करून चारच दिवसापूर्वी आपलं नाव गव्हार्मेंटच्या यादीत लावणारी ती....

आता तुम्हाला वाटलं असेल एवढं सगळं लिहिलं गेल. दुःख,कष्ट दारिद्र पण ती कोण आहे...

ती आहे.ऊसतोड कामगारांची पोरगी जिच्या लेखणीन मेलेले मुडदे सुद्धा जागे होतात.

शिव शाहू फुले आंबेडकर विचारांची डरकाळी फोडणारी वाघीण

इथल्या भांडवलशाहीला,आपल्या लेखणीच्या जोरावरती गुडघे ठेकवायला लावणारी

कधी विद्रोहाची तर कधी बंडाची तर कधी प्रेमाचीहाक देणारी. विद्रोही कवयित्री कु. आम्रपाली ज्ञानोबा पारवे



## अजितदादा मुख्यमंत्री झाले तर मी स्वत: फुलांचा गुच्छ घेऊन जाईल:रोहित पवार

**अहिल्यानगर (वृत्तसंस्था)**

अजितदादा मुख्यमंत्री होत असतील तर मी स्वतः जाऊन त्यांना फुलांचा गुच्छ देईल. पुतण्या म्हणून त्यांचा आशीर्वाद देखील घेईल, असे वक्तव्य शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे. तसेच ईव्हीएम च्या मुद्द्यावरून रोहित पवारांनी महायुती सरकारवर टीका देखील केली आहे. महाराष्ट्राची लोकशाही गुजरातच्या ईव्हीएममध्ये अडकत आहे का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.रोहित पवार म्हणाले, एकनाथ शिंदे केंद्रात जातील आणि त्यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे उपमुख्यमंत्री होतील, असे दिसत आहे. मात्र, अजितदादा मुख्यमंत्री होणार असतील तर मी स्वतः जाऊन त्यांना फुलांचा गुच्छ देईल. पुतण्या म्हणून त्यांचा आशिर्वाद देखील घेईल, असे रोहित पवार म्हणाले. दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेत्यांनी देखील अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छा व्यक्त केली आहे. मात्र, मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर आहे.रोहित पवार यांनी महायुतीवर देखील टीका केली आहे. रोहित पवार म्हणाले, महाराष्ट्राची लोकशाही गुजरातच्या ईव्हीएम मध्ये अडकत आहे का? लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर निवडणूक आयोगाने समोर आले पाहिजे, असेही रोहित पवार यांनी म्हंटले आहे. महाराष्ट्रातील हे राज्य देशातील विकसित राज्य आहे. बहुमत असताना देखील महाराष्ट्राचा निर्णय घेण्यासाठी दिल्लीला जावे लागत आहे, असा टोला देखील रोहित पवारांनी लगावला आहे.पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, येवला मतदारसंघातून छगन भुजबळ निवडून आले आहेत, त्यांचे मी अभिनंदन करतो. ईव्हीएम मॅनेज झाले नसेल म्हणून ते २६ हजार मतांनी निवडून आले असतील, असा टोला रोहित पवारांनी लगावला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्ते खचून जाऊ नयेत म्हणून मी लढत आहे. निवडणूक आयोगाला ऐकावे लागेल आणि ईव्हीएमचे पोस्टमार्टम करावे लागेल. ईव्हीएमच्या विरोधात सर्व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एकत्र आले पाहिजे आणि लढले पाहिजे, असेही रोहित पवार म्हणाले.



### महाराष्ट्राच्या खलनायकाला लोकांनी घरात बसवले

## सदाभाऊ खोत यांची पुन्हा एकदा शरद पवारांवर खोचक टीका

**माढा (वृत्तसंस्था)**

रयत क्रांती संघटनेचे आमदार सदाभाऊ खोत यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. जशा कुत्र्याच्या छत्र्या पावसाळ्यात येतात तशा छत्र्या आंदोलनाच्या येतील. महाराष्ट्राच्या खलनायकाला लोकांनी घरात बसवले आहे, अशी खोचक टीका सदभाऊ खोत यांनी केली आहे.सदाभाऊ खोत म्हणाले, मराठा समाजाला सर्वात जास्त कोणी दिले असेल तर ते भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी दिले असेल. मराठा समाजासाठी जे जे करता येईल ते देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. जशा कुत्र्याच्या छत्र्या पावसाळ्यात येतात तशा छत्र्या आंदोलनाच्या येतात. तसेच महाराष्ट्राच्या खलनायकाला लोकांनी घरात बसवले आहे, असे म्हणत शरद पवारांवर खोचक



शब्दात टीका केली आहे.पुढे बोलताना सदभाऊ खोत म्हणाले, देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे नेते आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत. महाराष्ट्रातल्या राजकारणातला चाणक्य देवेंद्र फडणवीस आहेत. त्यांना केंद्रातील नेत्यांचा पाठिंबा आहे. प्रस्थापितांच्या बुडाला जाळ लावण्याचे काम देवा भाऊ यांनी केले आहे, असे म्हणत सदभाऊ खोत यांनी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर टीका करताना सदभाऊ खोत म्हणाले, तंत्रज्ञान यायची सुरुवात झाली ती राजीव गांधी यांच्या काळामध्ये. ईव्हीएम हे सुद्धा काँग्रेसने आणले होते. आता तेच तंत्रज्ञानाला विरोध करत आहेत. तुम्हाला पुढची पिढी अडाणी ठेवायची आहे का? तुम्ही जिंकला की तुम्हाला चांगले वाटते आणि हरला की तुम्ही ईव्हीएमला दोष देतात.पुढे बोलताना सदभाऊ खोत म्हणाले, या मशीनला बोलता येत नाही, चालता येत नाही म्हणून तुम्ही त्याला दोष देतात. महाविकास आघाडी ही सरदारांची आघाडी, जे सर्व्हे केलेत ते रस्त्यावरती लोकांचे सर्व्हे केले. मात्र घरातल्या माय माऊलींचा सर्व्हे केला नाही. कारण ते घरात जेवत नाहीत, बाहेर जेवतात, असा टोला सदभाऊ खोत यांनी नाना पटोले यानं लगावला आहे.ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव ईव्हीएमच्या विरोधात तीन दिवसीय उपोषण करणार आहेत. यावर सदाभाऊ खोत म्हणाले, बाबा आढाव यांनी या वयात आंदोलन करणे योग्य नाही आणि ते आंदोलन कोणासाठी करत आहेत, ज्यांनी महाराष्ट्र लुटला, देशाची राख रांगोळी यांनी केली, त्यांनी पिण्याचे पाणी दिले नाही, शेतीसाठी पाणी दिले नाही, त्यांच्यासाठी त्यांनी आंदोलन करू नये, असा सल्ला खोत यांनी दिला आहे.

### परळी मतदारसंघातील जनतेच्या स्वाभिमानासाठी कायम संघर्ष करणार

## लोकशाहीचा गळा दाबून मिळवलेले यश हेच सत्ताधाऱ्यांचे खरे अपयश-राजेभाऊ फड

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि स्वतः शरदचंद्र पवार साहेब हे सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांच्या नेहमीच बाजूने राहिले आहेत. सत्तेत असताना नागरिकांच्या हितासाठी अनेक लोककल्याणकारी निर्णय त्यांनी घेतले तर सत्तेच्या विरोधात असताना जनतेच्या समस्या सोडवून घेण्यासाठी कायम रस्त्यावर संघर्ष केला. आत्ताचे निवडून आलेले सत्ताधारी हे लोकशाहीचा गळा दाबून सत्तेत आले आहेत. ते त्यांचे यश नाही तर अपयश आहे. सत्ता असो किंवा नसो असाच जनसेवेचा वसा आम्ही पुढे चालू ठेवणार आणि जनतेचा स्वाभिमान टिकून ठेवण्यासाठी कायम संघर्ष संघर्ष करण्याची तयारी आम्ही ठेवली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड म्हणाले आहेत.

परळी विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ, युवा आणि महिला स्वाभिमानी कार्यकर्त्यांची नव्याने मोठ बांधून पक्षाला मजबुती मिळवून देणार असून जनतेचा स्वाभिमान टिकवून ठेवण्यासाठी आणि शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या समस्या शासन दरबारी मांडून सोडवून घेण्यासाठी आम्ही संघर्षाची तयारी ठेवली असल्याचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. मतदान यंत्रात फेरफार करून, बोगस मतदान करून, मतदारांना मतदान करण्यापासून रोखून मिळवलेली सत्ता ही स्वार्थासाठी मिळवलेली सत्ता असते. आत्ताचे निवडून आलेले सत्ताधारी हे लोकशाहीचा गळा दाबून सत्तेत बसलेले लांडगे आहेत. त्यांच्यापासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी जाणते राजे शरदचंद्र पवार साहेब सक्षम आहेत. त्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना कमकुवत समजण्याची चूक विरोधकांनी करू नये. सत्तेत नसलो म्हणजे आम्ही संघर्ष करायला विसरलो नाहीत. जनसेवेसाठी आम्ही सदैव रस्त्यावर कार्यरत राहून लोकांसाठी संघर्ष करू अशीही भावना त्यांनी व्यक्त केली आहे.



### जितेंद्र आव्हाड एकनाथ शिंदेंच्या भेटीला 'वर्षा'वर

## राजकारणात मैत्री करण्यावर आचारसंहिता नाही-सामंत

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी शुक्रवारी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या या भेटीत दोन्ही नेत्यांत कोणती चर्चा झाली हे स्पष्ट झाले नाही. पण यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला ऊत आला आहे. या भेटीवर शिवसेना नेते उदय सामंत यांनी भाष्य केले. राजकारणात कुणी कुणाशी मैत्री करावी यावर कोणतीही आचारसंहिता नाही, असे सूचक विधान सामंत यांनी केले. अमित शहा यांच्या सूचनेनुसार आज मुंबईत महायुतीच्या नेत्यांची बैठक होणार होती. पण ही बैठक ऐनवेळी रद्द करण्यात आली आहे. ही बैठक रद्द होणे आणि जितेंद्र आव्हाड यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेणे, यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा चर्चांना उधाण आले आहे.



दरम्यान, जितेंद्र आव्हाड आणि एकनाथ शिंदेंच्या भेटीवर उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राजकारणात कुणी कुणाशी मैत्री करावी यावर कोणतीही आचारसंहिता नाही, असे सूचक विधान सामंत यांनी केले. जितेंद्र आव्हाड व शिंदे हे दोन्ही नेते ठाण्याचे आहेत. त्यांच्यात चांगली मैत्रीही आहे. त्यामुळे ते एकमेकांना भेटले असावेत. आव्हाड यांना शिंदेंसोबत यायचे असेल तर त्यांचे स्वागतच आहे. पण ते सोबत येतील, असे वाटत नाही, असेही सामंत यांनी म्हटले.जितेंद्र आव्हाड यांनी यापूर्वीही एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. गणेश चतुर्थीच्या पहिल्याच दिवशी जितेंद्र आव्हाडांनी एकनाथ शिंदे यांच्या घरी गेले होते. त्यावेळीही या दोन नेत्यांमध्ये जवळपास १५ मिनिटे चर्चा झाली होती. त्यानंतर आज पुन्हा एकदा आव्हाड यांची शिंदेची भेट घेतली. दोघांच्या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली, याबाबत कोणतीही माहिती समजू शकली नाही.

## सध्या चांगला मुहूर्त नाही,२ डिसेंबरनंतर चांगल्या मुहूर्तावर शपथविधी होईल-केसरकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**-विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून ६ दिवस उलटले तरी अद्याप सरकार स्थापन झाले नाही. महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार अशा चर्चा सुरू असून शपथविधी आणि सरकार कधी स्थापन होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. अशात शिवसेना नेते दीपक केसरकर यांनी शपथविधी कधी होणार यावर भाष्य केले आहे. सध्या चांगला मुहूर्त नाही, येत्या २ तारखेनंतर जेव्हा चांगला मुहूर्त असेल तेव्हा सरकार स्थापन होईल, असे दीपक केसरकर यांनी सांगितले. तसेच एकनाथ शिंदे यांचा योग्य तो सन्मान ठेवला जाईल, असे दिल्लीतून सांगण्यात आल्याचेही ते म्हणाले. सध्या मुहूर्त नसून येत्या २ तारखेपर्यंत कोणताही चांगला मुहूर्त नाही. २ तारखेनंतर जेव्हा चांगला मुहूर्त असेल तेव्हा सरकार स्थापन होईल. २ डिसेंबरनंतर कधीही सरकार स्थापन होऊ शकते, असे दीपक केसरकर म्हणाले. तसेच या शपथविधीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि सर्व राज्याचे मुख्यमंत्री अशी अनेक लोक



उपस्थित राहू शकतात. त्यांच्या सुविधेप्रमाणे सगळे ठरविले जाईल, असेही केसरकर म्हणाले.दिल्ली काय घडामोडी होत आहेत, याबाबत मला माहिती नाही. दिल्ली एकनाथ शिंदे यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यासोबत चांगले संबंध आहेत. एकनाथ शिंदे यांचा योग्य तो सन्मान केला जाईल, असे दिल्लीतून सांगण्यात आले आहे. त्यांचा सन्मान म्हणजे आम्हा सगळ्यांचा सन्मान आहे. मी शिंदेंच्या मागे ठामपणे उभे राहणार आहे. अमित शाह सांगतील, त्याप्रमाणे काम करायचे आहे, असे केसरकर म्हणाले.दरम्यान, नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी प्रशासनाने विविध जागांची चाचपणी सुरू केली आहे. त्यानुसार पहिली पसंती शिवाजी पार्कला असल्याची माहिती आहे. पण याचवेळी रेसकोर्स, ब्रेबॉर्न स्टेडियम, राजभवन या पर्यायांचीही चाचपणी केली जात आहे. राजशिष्टाचार विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर व मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी यासंबंधी शिवाजी पार्कची पाहणी केल्याची माहिती आहे. आझाद मैदान, महालक्ष्मी रेसकोर्स व एमएमआरडीए मैदानाचाही प्रशासनाकडून विचार सुरू आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077